International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.7 No.4 Mar–Apr 2020

# पंडित जितेंद्र अभिषेकी यांचा भावसंगीतातील सांगीतिक व साहित्यिक दृष्टीकोन: एक अभ्यास

**शर्वरी विनोद डिग्रजकर**

संशोधक विद्यार्थी
संगीत व नाट्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**गोषवारा:**

मराठी भावसंगीताचा १९६० सालानंतर खऱ्याअर्थाने सुवर्णकाळ सुरू झाला. या अगोदर १९४० सालानंतर प्रसिद्ध भावगीत गायक व संगीतकार गजाननराव वाटवे यांनी मराठी कवितांना चाली लावून मराठी भावसंगीताची मुहूर्तमेढ रोवली. सुधीर फडके, श्रीनिवास खळे, हृदयनाथ मंगेशकर, यशवंत देव इत्यादी संगीतकारांनी भावसंगीताची अवीट गोडी मराठी रसिकांना लावली. याच काळात गंधर्व युग संपून नवीन संगीत नाटकांचा उदय झाला होता. पुरुषोत्तम दार्व्हेकर, वसंत कानेटकर इत्यादी नाटककारांची संगीत नाटके उदयाला आली. या नाटकांना वैविध्यपूर्ण संगीत देणारा संगीतकार म्हणून पं.जितेंद्र अभिषेकींचा अर्थात अभिषेकी युग सुरू झाले. सुरुवातीला संगीत नाटकातील पदांना भावगीत अंगाने चाली देण्याचा प्रयत्न मो.ग.रांगणेकर यांच्या कुलवधू नाटकात झाला आणि या पदांच्या सुंदर चाली ज्योत्स्नाभोळे यांच्या गोड गळयामुळे व गायकीमुळे अजरामर झाल्या. याच पूर्वसूरीचा अंदाज पं.जितेंद्र अभिषेकी यांनी संगीत दिलेल्या संगीत नाटकातील पदांमध्ये दिसून येतो. भावगीत अंगाने जाणाऱ्या अनेक चाली अभिषेकींनी संगीत दिलेल्या अनेक नाटकांमध्ये दिसून येतात परंतु इतर मराठी संगीतकारांप्रमाणे अभिषेकिनीही अनेक मराठी कवितांना,भावगीतांना चाली लावल्या आहेत. यात काही मराठी गझलाही आहेत. याशिवाय अभिषेकींनी इतर संगीतकारांच्याही रचना गायलेल्या दिसून येतात यात अभिषेकींची शब्दोच्चारणाची विशिष्ट पद्धत,स्वर व शब्दांच्या माध्यमातून भाव उत्पन्न करण्याची हातोटी, साहित्याचा गाढा अभ्यास या गुणांचा वेध प्रस्तुत संशोधनामध्ये घेतला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे अभिषेकींनी चाली दिलेल्या रचना त्यांच्या स्वतःच्या आवाजात ध्वनिमुद्रित झाल्या आहेत.

**प्रस्तावना व परिचय:**

पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी केवळ संगीत नाटकांना किंवा नाट्यपदांना चाली दिल्या नाहीत तर अनेक भावगीतांना, मराठी-हिंदी गझलांना चाली दिल्या आहेत त्यांनी मराठी संतांच्या रचनांना अभंगाना तसेच हिंदी संतांच्या रचनांना अनोख्या ढंगाच्या चाली दिल्या आहेत या शिवाय कोकणी भाषेमध्येही अनेक संगीत रचना त्यांनी केल्या आहेत. त्यांच्या या संगीतामध्ये नाविण्य तर आहेच पण रागसंगीताची कास कुठेही सुटलेली नाही. शास्त्रीय गायनाच्या परंपरेकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन आदरयुक्त तर होताच पण त्यात नव्या वाटा शोधण्याचाही विचार होता. त्यांनी चित्रपट संगीताची वाट हाताळली पण या सर्व रचना करताना त्यांनी संगीतकार ही भूमिका जास्त मिरविण्यापेक्षा सिद्धहस्त गायक म्हणून स्वतःला सिद्ध करण्यात धन्यता मानली. अभिषेकींची संगीत देण्यामागची भूमिका कशी होती, त्या चाली लोकप्रिय होण्यामागचे गमक काय होते?, त्या चालींमध्ये दिसून येणारी शिस्त, सौन्दर्य या बद्दलचे विचार मांडणे अभ्यासकास क्रमप्राप्त आहे. त्यामुळे त्यांनी दिलेल्या संगीताचा सौंदर्यदृष्टिकोनातून विचार करता येईल.

अभिषेकींनी चोखामेळा, सोयरोबा, रसखान अश्या फारश्या त्या काळी प्रकाशात नसलेल्या संतांच्या रचना रसिकांसमोर आणल्या. बा.भ.बोरकर, शंकर रामाणी, बालकवी, केशवसूत, शांता शेळके, सुरेश भट, सुधीर मोघे, आदि मराठी कवींच्या काव्य रचना आपल्या संगीत प्रतिभेने सजविल्या. पं.जितेंद्र अभिषेकी हे स्वत: उत्तम गायक होते. शास्त्रीय, उपशास्त्रीय आणि सुगम गायकीवर व ती उत्तमरीत्या पेश करण्यावर त्यांचे प्रभुत्व होते उत्तम साहित्याची जाण असल्याने काव्य निवडीमागचा चोखंदळपणा, अर्थानुरूप शब्द टाकण्याची हुकमत, त्यांची चाल व गायकी ऐकताना क्षणोक्षणी जाणवते. वेळप्रसंगी त्यांनी शब्दरचनाही केल्या आहेत. 'भूला भटका पथहारा | अब शरण तुम्हारी आया' हे शब्द अभिषेकींचेच. शास्त्रीय संगीताबरोबरच उपशास्त्रीय व सुगम संगीत ते विशिष्ठ ढंगाने मैफिलीत पेश करीत असत. कवि सुधीर मोघे रचित 'मन लोभले मन मोहले' या भावगीतामध्ये

'ना योजिता नजरेतुनी
मन जाय पुरते वाहुनी
आता कशाची बंधने ?

असा अंतरा गाताना अभिषेकी बुवा केवळ भावगीत गायक आहेत की काय? असा प्रश्न उपस्थित होण्याइतपत त्यांनी या भावगीताला न्याय दिला आहे. बुवांनी केवळ स्वतःच्या रचना गायल्या नाहीत, तर संगीतकार राम फाटक, सुधीर फडके, पु.ल. देशपांडे, दत्ता डावजेकर इत्यादी अनेक संगीतकारांच्या रचना त्यांनी गाऊन लोकप्रिय केल्या आहेत. त्यांनी गद्य लिखाणही केले आहे अनेक ठिकाणी त्यांचे लेखन साहित्य प्रसिद्ध झाल्याचे पाहायला मिळते. इतकी साहित्य आणि संगीतबद्दलची समृद्ध जाणिव असणारी व्यक्ती पं.जितेंद्र अभिषेकींच्या रूपाने मराठी संगीत जगताला लाभली आणि त्यांनी आपल्या कर्तृत्वाने रसिकांना एक निराळाच आनंद दिला.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या भावसंगीत गयाकीच्या वाटचालीचा वेध घेणे व तिची सध्य:काला पर्यन्तची लोकप्रियता तपासणे.

२ . भावसंगीताच्या चाली, गायकी आणि त्यातील साहित्यिक दृष्टीकोन अभ्यासणे

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन हे द्वितीय तथ्य संकलनावर आधारलेले आहे यासाठी विविध ग्रंथ, स्मरणिका यांचा वापर केला आहे.

**अभिषेकींची भावगीते**

अभिषेकींच्या संगीत दिग्दर्शनाच्या कालखंडात मराठी भावगीत या प्रकाराला उत्कर्षाचे दिवस आले होते. अभिषेकींनी मोजक्या गझलाही केल्या. शंकर रामाणी यांच्या ‘रन्ध्रात पेरीली मी’ या गझलेला त्यांनी काहीशी हंसध्वनी रागाच्या अंगाने जाणारी चाल लावली. ही संगीत रचना सुगम संगीतातील एक अप्रतिम रचना आहे

रंध्रात पेरिली मी आषाढ दर्द गाणी

उन्मादल्या सरींची उमजून घे कहाणी

ही रचना पं.जितेंद्र अभिषेकी यांनी संगीतबद्ध तर केलीच पण स्वतःच्या आवाजात ध्वनीमुद्रितही केली. दादरा तालात निबद्ध रचनेमध्ये प्रत्येक अंतऱ्याची चाल बुवांनी वेगळी ठेवली आहे मुखडयाच्या चाली मध्ये कहाणी शब्दावर अवरोही येणे हे मुखडा आकर्षक करण्यामध्ये महत्वाचे ठरते त्याचबरोबर

धारांत नाहणारी मध्ये येणारी हरकत, हूड शब्दाचे उच्चारण इत्यादी अनेक सौंदर्यबिंदू या रचनेत दिसून येतात. दुसरे म्हणजे या रचनेत जोडाक्षरे, शब्दांचा जडपणा खूप आहे अश्यावेळी चालीमध्ये, संगीतरचनेमध्ये शब्दांचे उच्चारण सांभाळणे बरोबरीने खटका, मुर्की इत्यादी अलंकरण सांभाळणे कठीण असते. परंतु या सर्व कसोट्या पार करून ही रचना उत्तम रचना ठरली आहे

कविश्रेष्ठ बा.भ. बोरकर हे मूळ गोव्याचे कवि. गोव्याच्या निसर्गाशी एकरूप झालेले आणि उत्तम शब्दांची मौतिक माला ज्यांच्या काव्यात आढळते असे मराठीतील प्रसिद्ध कवि महाराष्ट्राचे लाडके दैवत पु. ल. देशपांडे व त्यांच्या पत्नी सुनिता देशपांडे यांनी आपल्या काव्यवाचनाच्या माध्यमातून'बोरकर' मराठी मनामनात पोहोचवले. पं. जितेंद्र अभिषेकी हे सुद्धा गोव्याचे. त्यामुळे बोरकरांची कविता आणि अभिषेकींचे संगीत या दोन गोष्टी एकत्र येणे हा दुग्धशर्करा योग आहे 'कशी तुज समजाऊ सांग' हे उत्तम शब्दकळा असलेले काव्य जेव्हा अभिषेकी बुवा संगीतबद्ध केले त्यावेळी ते उत्तम भावगीत म्हणून लोकप्रिय झाले. या भावगीताचा निर्मितीबद्दल पं. राजा काळे लिहितात की "बुवा कधी कधी रागातून चाल शोधत तर कधी काव्यातून. कधी तर एखादा राग त्यांच्या मनात सतत रुंजी घालत असे. ते म्हणत असत, हा यमन काही माझा पिच्छा सोडत नाही. काय करावे ..मुद्दाम दुसराराग गायला घेतला तरीही तो संपतो न संपतो तोच परत यमन डोकावतो. या यमनला कसं समजावं बरं आणि या समजावण्यातून'कशी तुज समजावू सांग' हे बोरकरांचं भावगीत स्वरबद्ध झालं"

कशि तूज समजावु सांग?

कां भामिनि उगिच राग?

या काव्यात केविं (कसे,कश्या प्रकारे), जेविं (जसा,ज्याप्रमाणे),प्रबंध (तजवीज), प्रयाग (संगम), भामिनी (स्त्री), याग (पूजा), विकल्प (संशय किंवा संदेह) असे कितीतरी वेगळे आणि तेवढेच लयात्मक, गोड शब्द 'बोरकरांनी' वापरले आहेत. यामध्ये यमन सारखा प्रसन्न राग अभिषेकींनी वापरला आहे. काव्यातील हळुवारपणा जपत जपत वेगवेगळ्या स्वरपंक्तींनी प्रत्येक ओळ आणि अंतरे सजत गेले आहेत 'का भामिनी उगिच राग? यातील 'उगिच' मधील प्रश्नार्थक उच्चारण, 'हास्याहून मधुरूसवा' किंवा 'चाफेकळी केविं फुले' अश्या स्तुतीसुमनांमध्ये स्वरांची बुवांनी केलेली गुंफण लाजवाब आहे.ओठांचे

फेड बंध' मध्ये आरोही गेलेली तानवजा हरकत आणि 'श्वासांचे करू प्रबंध' मध्ये उच्चारणाचा जपलेला हळुवारपणा इत्यादी अनेक सौंदर्यमूल्यांनी हे चालू भावगीत सजले आहे.

भावगीत या शब्दाचा अर्थ त्या शब्दातच आहे. कवीने लिहिलेल्या काव्यास न्याय देणे ही त्याची प्राथमिक गरज आहे. कवीने व्यक्त केलेला भाव साकार करणे,हाच भावगीताचा धर्म आहे.

बोरकरांचे आणखी एक भावगीत अभिषेकींनी संगीतबद्ध केले आहे आणि गायले आहे ही रचना केरवा तालातील आहे.

नाही पुण्याची मोजणी

नाही पापाची टोचणी

जिणें गंगौघाचे पाणी

यात जीवनाविषयीचे सार आहे. अभिषेकींनी या भावगीतातील प्रत्येक शब्दोच्चार अतिशय शिस्तबद्ध आणि भावपूर्ण केला आहे. 'कैवल्याच्या चांदण्याला' या पदामधील 'जन्म मरण नको आता, नको येरझार' ही पंक्ति अभिषेकींनी जेवढी भावपूर्ण,पिळदार म्हटली आहे तेवढीच भावपूर्णता 'नाही पुण्याची मोजणी' मधील 'पूजेतल्या पानाफुला' मध्ये दिसून येते.

पं.अभिषेकींनी कविवर्य बा.भ. बोरकर यांची परमेश्वरी रागाच्या आधारे झपतालात बांधलेली पुढील रचना त्यांच्या संगीत प्रतिभेचे मनोहारी दर्शन घडविते

अनंता तुला कोण पाहू शके?

तुला गातसां वेद झाले मुके

मतीमंद अंधा कसा तू दिसे?

तुझी रूपतृष्णा मनाला असे

हे भावगीत नसून या काव्यरचनेला प्रार्थना म्हटलं तर अधिक योग्य ठरेल पुन्हा बोरकरांचे या काव्यातील शब्दनाविण्य. जल्पना (वल्गाना, फुशारकी, बढाई), निस्तुला (अतुलनीय), भक्तीबाष्पांजली, पद्मपत्र (कमळाचे पान) असे अनेक मोहक शब्द या काव्यात आले आहेत. हे चार अंतऱ्याचे काव्य आहे. अभिषेकी बुवांनी त्या अनंताला, ईश्वराला आपल्या भावपूर्ण स्वरांतून आर्त साद घातली आहे ही ईषस्तुती झापतालामध्ये एखाद्या बंदिशीसारखी चपखल बसली आहे.

अभिषेकींनी इतर संगीतकारांच्या रचना म्हणजे भावगीते गायली आहेत. अशीच एक मराठी भाषेतील प्रसिद्ध कवि सुधीर मोघे यांची काव्य रचना ‘तपत्या झळा उन्हाच्या’ याचे संगीत ज्येष्ठ संगीतकार ‘राम फाटक’ यांनी केले आहे. ही रचना अभिषेकींच्या धीरगंभीर आवाजात ध्वनिमुद्रित झाले आहे

तपत्या झळा उन्हाच्या झेलीत चाललो
मी बीज सावल्यांचे फेरीत चाललो

या काव्यात वेदनेचा आवेग आहे. तो व्यक्त करताना अनेक ठिकाणी आलेले दिर्घ ठेहराव तसेच स्वरशब्दांचा विखुरलेपणा यामुळे वैराणपणा, उन्हाची तप्तता, झळा, कोरडेपणा, वैशाखाचा दाह अगदी अचूक व्यक्त झाला आहे. ‘झळा’ शब्दाचे अभिषेकींचे उच्चारण, ये कोरड्या गळयात सूर कोठला’ यातील आर्तता यामुळे एकप्रकारचा हताशपणा संगीत आणि गायकीमधून व्यक्त झाला आहे. असेच दोन भावगीते कविवर्य मंगेश पाडगांवकर यांनी लिहिली होती आणि प्रसिद्ध लेखक व संगीतकार पु.ल. देशपांडे यांनी संगीतबद्ध केली होती. ती भावगीते पु. ल. नी मुंबई आकाशवाणी साठी निर्मिती केलेल्या ‘बिल्हण’ या सांगीतिकेमध्ये घेतली होती. यामध्ये पं. जितेंद्र अभिषेकी गायले होते आणि पुढे ती दोन भावगीते त्यांच्याच आवाजात ध्वनिमुद्रित झाली आहेत व लोकप्रिय ठरली आहेत. ती म्हणजे ‘ शब्दावाचून कळले सारे’ आणि ‘माझे जीवन गाणे’ ही दोन भावगीते होत. या बद्दल पु. ल. देशपांडे लिहितात की “मी संगीत दिग्दर्शन केलेल्या ‘बिल्हण’ या संगीतिकेत जितेंद्रनं काम केलं होतं ‘बिल्हण’ मी दोन वेळा केलं. दुसऱ्यांदा जेव्हा केलं तेव्हा त्यात जितेंद्र होता. अतिशय छान गायला होता.”

शब्दावाचुन कळले सारे शब्दांच्या पलिकडे
प्रथम तुला पाहियले आणिक घडू नये ते घडले

या भावगीतासाठी ‘अद्धा’ तालाचा व काफी सदृश्य रागाचा केलेला वापर यामुळे काव्यातील शब्दांच्या उच्चारणाला खूप चांगला न्याय मिळाला आहे. दुसरे भावगीत आहे ‘माझे जीवन गाणे’ हे आद्धा त्रिताल व भूप रागात निबद्ध केले आहे.

माझे जीवन गाणे
व्यथा असो आनंद असू दे
प्रकाश किंवा तिमिर असू दे
वाट दिसो अथवा न दिसू दे,गात पुढे मज जाणे

या गाण्यामध्ये चालीचा साधेपणा, सुबकता खूप चांगल्याप्रकारे जपली आहे त्याचबरोबर काहीकाही ठिकाणी शब्दांचा लडिवाळपणाही जपला आहे. उदाहरणार्थ 'झुळझुळतात तराणे', 'उसळे प्रेमदिवाणे' यातून शब्दातीत आनंदही व्यक्त झाला आहे अभिषेकींच्या आवाजाने ही दोन्ही भावगीते आज लोकप्रिय ठरली आहेत.

दिवे लागले रे दिवे लागले
तमाच्या तळाशी दिवे लागले
दिठींच्या दिशा खोल तेजाळताना
कुणी जागले रे कुणी जागले

हे कविवर्य 'शंकर रामाणी' यांचे भावगीत आहे. एक गोष्ट महत्वाची वाटते की अभिषेकींनी जी काव्य निवडली आहेत ती ठरविकच आहेत. शिवाय त्यातील शब्दही अवघड आहेत. 'तमाच्या तळाशी दिवे लागले' हे व्यक्त करण्यासाठी 'मारवा' रागाचा घेतलेला आधार यामुळे हे भावगीत धीरगंभीर आहे शिवाय जलद झपतालाचा वापर यामुळे एखाद्या बंदिशीप्रमाणे सेमला येणे हे यातील गायकीचे सौंदर्य आहे. यावरून अभिषेकींच्या संगीताचे वेगळेपण ठायी ठायी जाणवते. प्रत्येक रचना परस्परांमध्ये वेगळेपण जपते. पं. राजा काळे लिहितात " Good interpretation is an Art असे म्हटलेलेच आहे. परंपरेच्या अभ्यासातून एखाद्या गोष्टीचे मर्म (theme) लक्षात घेऊन ती वेगळया पद्धतीने मांडणे व लोकांपर्यंत पोहोचवणे, हे कला-संगीताचा साधक (Fine Artists) व व्यासंगी कलाकार (ज्याला साहित्य व काव्याचीही चांगली जाण आहे) करू शकतात, अन्यथा ती मांडणी फार उथळ होते. अभिषेकीबुवांनी शब्दांना सुरांचे सामर्थ्य दिले भावनेला शास्त्रकाट्याची कसोटी दिली असे मला वाटते"

**निष्कर्ष:**

पं. जितेंद्र अभिषेकी हे त्यांच्या समकालीन गायक संगीतकारांपेक्षा वेगळी दृष्टी असणारे गायक संगीतकार होते. मुळात शास्त्रीय संगीताचा पिंड असल्यामुळे आणि शास्त्रीय संगीताबरोबर इतर सर्व प्रकारच्या संगीताचा अभ्यास असल्यामुळे त्यांच्या भावसंगीतातील चाली सुद्धा वैशिष्ट्यपूर्ण होत्या त्यामध्ये रागाची छटा कुठेही सुटलेली नाही. भावगीत गायनामध्ये अभिषेकींची स्वत:ची विशिष्ट अशी

उच्चारणाची लकब होती. त्यामुळे त्या गाण्यातील भावांग लगेचच ऐकणाऱ्याच्या काळजाचा ठाव घेत असे.

अभिषेकींचा आवाज किंवा त्यांच्या चाली आजही ताज्यातवान्या आहेत. त्याची अवीट गोडी संगीत स्पर्धेत भाग घेणाऱ्या नवीन पिढीलाही मोहिनी घालते. त्या लोकप्रिय रहाण्यामध्ये त्यातील काव्य, अर्थपूर्ण शब्द व चाली आणि पं.जितेंद्र अभिषेकी यांचा धीरगंभीर आणि भावसंगीताला न्याय देणारा आवाज यांचा महत्वाचा वाटा आहे.

**संदर्भ:**

१. देशपांडे, वि.भा (संपादक): स्वराभिषेक,पं.जितेंद्र अभिषेकी सत्कार समिति,१९९३

२. दरेकर, मोहन: माझे जीवन गाणे,मधुश्री प्रकाशन, पुणे.,प्रथम आवृत्ती २००५

३. मोघे, सुधीर: गाणारी वाट, मेनका प्रकाशन,पुणे.,द्वितीय आवृत्ती २००९